‘छत्रपती संभाजी महाराज यांचा राज्यकारभार : एक अभ्यास’

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड
अंतर्गत सामाजिकशास्त्रे विद्याशाखेतील ‘इतिहास’ विषयाच्या
विद्यावाचस्पती (पीएच.डी.) पदवीसाठी सादर करण्यात येणाऱ्या

शोधप्रबंधाचा आराखडा

• संशोधक •
प्रा. अनिरुद्ध सर्जेराव उढाण
एम.ए., बी.एड.
इतिहास विभाग,
अंकुशराव टोपे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, जालना

• मार्गदर्शक •
डॉ. आर. ए.स. फुन्ने
प्राचार्य,
स्व. नितीन कला व विज्ञान महाविद्यालय, पाथरी, जि. परभणी

ऑगस्ट २०१६

‘छत्रपती संभाजी महाराज यांचा राज्यकारभार : एक अभ्यास’

संभाजी राजे यांचे नांव जगाच्या इतिहासात लिहिले गेले असून, पंडित जवाहरलाल नेहरू यांनी त्यांच्या ‘डिस्कव्हरी ऑफ इंडिया’ या ग्रंथात संभाजी राजे यांची नोंद घेतलेली आहे. अशा थोर विराचा म्हणजेच संभाजी राजे यांच्या राज्यकारभाराचा संशोधन दृष्टीने आढावा घेतला तर इतिहासात ज्यांनी अतुल्य पराक्रम केलेले आहेत, अशा शूर विरांच्या पंक्तीत संभाजी राजे यांचे नांव समाविष्ट करावे लागते; परंतु जन्मापासूनच या विराच्या पाठीमागे दुर्दैव हात धुऊन मागे लागले आहे. त्यामुळे त्यांच्या पराक्रमाला वेगवेगळे अडथळे निर्माण होऊन संभाजी राजे यांनी दाखविलेला पराक्रम आणि त्यांनी अंगिकारलेली धार्मिक, राज्यकारभारविषयक आणि मुलकी स्वरूपाची धोरणे धूसर झालेली दिसत आहेत. संभाजी राजे यांनी स्वराज्याच्या प्रदेशरक्षणासाठी केलेली धडपड आणि लढायांची धोरणे, त्यांच्या संपूर्ण जीवनाचा एक अविभाज्य भाग असून, त्यात त्यांना कधीच स्थिरता व स्थैर्य मिळालेले नाही. अशा परिस्थितीत शिवाजी राजे यांच्या मृत्युनंतर स्वराज्याचे रक्षण त्यांनी केलेले आहे. म्हणूनच त्यांच्या राज्यकारभारविषयक धोरणाला एक आगळेवेगळे महत्त्व आहे, याचा संशोधन दृष्टीने विचार या शोध प्रबंधातून करावयाचा आहे. या संशोधनाची सुरुवात संभाजी राजे यांच्या जन्मापासून करावयाची असून, दिनांक १४ मे १६५७ रोजी पुरंदर किल्ल्यावर संभाजी राजे यांचा जन्म झाला असून, त्यांच्या जन्मानंतर अल्पावधीतच म्हणजे दिनांक ५ सप्टेंबर १६५९ रोजी त्यांच्या मातोश्री सईबाईंचे निधन झालेले आहे. त्यामुळे मातेचे छत्र लहानपणीच हरवून हा राजा दुर्दैवी ठरला आहे आणि हा सर्व भार जिजाबाई म्हणजे शिवाजी राजे यांच्या आई यांच्या पडला आहे. इ.स. १६६५ साली जून महिन्यातच मोगल-मराठ्यांचा तह होऊन संभाजी राजे यांना मोगलांची पाच हजारी मनसबदारी मिळाली असून, ही मनसबदारी जयसिंगाकडून त्यांनी स्वीकारली आहे. म्हणजे अत्यंत लहान वयातच राज्यकारभार कसा करावा आणि स्वप्रदेशरक्षण कसे करावे, ही जबाबदारीची कामे संभाजी राजे यांच्यावर येऊन पडलेली दिसते आहे. त्यामुळे एक मुक्त, आनंदी, स्वच्छंदी वातावरण आणि त्यात बालपणाचे

होणारे पोषण संभाजी महाराज यांच्या नशिबी आले आहे, ही बाब यातून स्पष्ट होत आहे, तर बालपणातच राजकारणाचे डावपेच व बलदंड अशा औरंगजेबाशी त्यांची गाठ पडलेली असून, दिनांक ११ मे १६६६ रोजी शिवाजी महाराजांबरोबर ते आगऱ्यास पोहोचले असून, या ठिकाणी बादशहा औरंगजेबाकडून त्यांनी सरोपा, रत्नजडित खंजीर व एक मोत्याची माळ भेट स्वीकारली आहे, तर या ठिकाणच्या बंदिवासातून दिनांक १७ ऑगस्ट १६६६ रोजी ते शिवाजी महाराजांबरोबर निसटले. हा थरारक अनुभवही त्यांना लहान वयातच आला असून, मोगलांबरोबरचा तह मोडल्यामुळे संभाजी राजे यांची मनसबदारी संपुष्टात आली आहे. हा कटू राजकारणी अनुभवही त्यांनी अत्यंत लहान वयातच पचविला आहे.

पुढे शिवाजी राजे यांनी संभाजी राजे यांना स्वतंत्र राज्यकारभार पाहण्याची संधी उपलब्ध करून दिली. त्यासाठी लेखक व अन्य तजवीज करून देण्यात आले. आबाजी पंत भेदे यांना पन्हाळगडी पाठवून त्यांच्याबरोबर साठ लोक देण्यात आले. या साठ लोकांवर देखरेख ठेण्यासाठी कोंडूजी फर्जंद या माणसाची तजवीजही शिवाजी महाराजांनी करून दिली. यावेळी संभाजी राजे यांचे वास्तव्य पन्हाळगडी होते, तर येथे असतानाच १६७४ च्या जून महिन्यात संभाजी राजे यांच्याकडे इंग्रज व्यापारी कंपनीची जबाबदारी देण्यात येऊन शिवाजी महाराजांनी संभाजी राजे यांना युवराज पदाचा मान बहाल केला आणि राजापूर वखारीच्या लुटीबाबत भरपाई संबंधीच्या वाटाघाटी करण्यासाठी संभाजी राजे स्वतंत्रपणे इंग्रजांकडे गेले. यावेळी शिवाजी महाराज किंवा त्यांचा राज्यकारभारातील कोणताही मुत्सद्दी संभाजी राजे यांच्याबरोबर नव्हता, ही विशेष बाब आहे व इंग्रजांबरोबरच्या नुकसान भरपाईत त्यांनी इंग्रजांना आवडेल व मराठी मुलुखाचेही नुकसान होणार नाही, ही भूमिकाही यथायोग्य पार पाडली होती; परंतु यामुळे शिवाजी महाराजांच्या दरबारातील काही मुत्सद्दी मात्र खूप नाराज झाले होते व त्यांच्या नाराजीवरील प्रतिक्रियेने व संभाजी राजे यांनी त्यांच्याविरुद्ध उचललेल्या कार्यवाहीने संभाजी राजे क्रूर आहेत, हा संभाजी महाराजांवर आक्षेप, कलंक लागला होता, तर या नाराजीमुळेच संभाजी राजे यांनी अत्यंत विमनस्क अवस्थेत दिलेरखानाची भेट घेतली व तेथील सप्तहजारी सन्मान स्वीकारून मोगलांच्या गटात राहणे पसंत केले; परंतु संभाजी

राजे यांचे हे कृत्य शिवाजी महाराजांच्या स्वराज्य धोरणाच्या विरोधात आहे, असा डंका त्यांच्या विरोधकांनी पिटविला व त्यातूनच शिवाजी महाराजांच्या स्वराज्यातील संभाजी राजे यांचे स्थान कलंकित होऊन बसले आहे, तर दिलेरखानाने राजे संभाजीच्या बळावरच मराठ्यांच्या अनेक मुलुखांत हल्ले केले व कित्येक मराठी सैन्याला कंठस्नान घातले ही, बाब सहन न होऊन संभाजी राजे दिलेरखानाच्या गोटातून पुन्हा परत आले आणि दिनांक १३ जानेवारी १९८० रोजी छत्रपती शिवाजी महाराज व संभाजी राजे ह्या पिता-पुत्राची पन्हाळगडावर पुन्हा भेट झाली, हे ऐतिहासिक सत्य असूनही, संभाजी राजे यांचा सन्मान तत्कालीन मुत्सद्यांच्या मनात उतरला नाही, ही वास्तव बाब आहे, तर तत्कालीन स्वराज्याचे शत्रू असलेल्या इंग्रजांनाही संभाजी राजे यांचा भरवसा वाटला नाही. एवढेच नाही, तर संभाजी महाराजांकडून केव्हाही कारवार लुटले जाण्याची भिती त्यांच्या मनात घर करून राहिली होती.

अशा भयावह परिस्थितीतच दिनांक ३ एप्रिल १६८० रोजी छत्रपती शिवाजी महाराजांचे रायगडावर महानिर्वाण झाले. या संधीचा फायदा घेण्याचे शिवाजी महाराजांच्या दरबारातील मुत्सद्यांनी ठरविले. अन्नाजी पंत, सुरनिस, सचिव यांच्या पुढाकाराने राजारामास मंचकारोहण करून संभाजी राजांना कैद करण्याचे ठरवून मोरोपंत पेशवे यास पन्हाळ्याकडे पाठविण्यात आले; परंतु याचवेळी म्हणजे दिनांक २६ एप्रिल १६८० रोजी रावजी पंडितांकरवी असे हुकूम पाठविण्यात आले की, आता देश संभाजी राजे यांचा झाला आहे. तेव्हा स्वराज्यातील सर्व सुभेदारांनी राजे संभाजी यांच्यासमोर पन्हाळ्यास येऊन हिशोब द्यावेत. या आदेशानुसार जे सुभेदार वागले, त्यांचा संभाजी राजे यांनी सन्मान केला, तर आज्ञा मोडणाऱ्या हवालदार व सुभेदारांना त्यांनी कैद केले, तर काहींना कायमचे कामावरून काढून टाकले. या सर्व बाबींमुळे संभाजी राजे यांची काहीही चूक नसतानाही ते क्रूर आहेत, असा सर्वत्र गाजावाजा झाला. त्यामुळे संभाजी राजे यांची प्रतिमा मलीन झाली. या गदारोळात दिनांक ६ मे १६८० रोजी सर्वांच्या विचाराने राजाराम राजे मंचकारूढ झाले, तर दिनांक १८ जून १६८० रोजी संभाजी राजे रायगडावर आले व राज्य करू लागले आणि याच दिवशी

राजारामास त्यांनी कैद केले, तर दिनांक २० जुलै १६८० रोजी संभाजी राजे यांचे मंचकारोहण झाले.

राजे शिवाजी महाराजांच्या दरबारात ज्यांनी शिवाजी महाराजांच्या स्वराज्यासाठी अतोनात कष्ट घेतले होते, तेच मुत्सद्दी राजे संभाजी यांच्या विरोधात गेले. त्यांनी सोयराबाईंशी संधान साधून राजाराम महाराज यांना गादीवर बसविले. एवढेच नाही, तर संभाजी राजे यांना कैद करण्याचा डावही रचला. हे सर्व कारस्थान संभाजी राजे यांना कळाल्यावर या कटातील कित्येकांना त्यांनी कैद केले. काहींना गडावर बंदिस्त केले, तर काहींना कायमचेच राज्यकारभाराच्या कामातून काढून टाकले. या सर्व अडचणींशी तोंड देता-देता संभाजी राजे यांची मनःस्थिती अत्यंत विषादी झाली. म्हणूनच इ.स. १६८० च्या नोव्हेंबर महिन्यात येळशी येथील बाबा याकूद फकिराचे छत्रपती संभाजी राजांनी दर्शन घेतले, तर याच वेळी स्वराज्याचे रक्षण करण्यासाठी त्यांनी मुंबईकर वकिलास, सिद्दीस मदत न करण्याबद्दल ताकीद दिली, तर सैन्याची एक तुकडी सुरतेकडे व दुसरी बऱ्हाणपूरकडे पाठविली व तिसरी बहाद्दूर खानावर चालून जाण्यासाठी रवाना केली. म्हणजेच संभाजी राजे एकाचवेळी तीन बाहेरचे शत्रू, तर एक अंतःस्थ मुत्सद्यांचा गट शत्रू यांच्याशी लढा देऊ लागले होते.

याचवेळी म्हणजे दिनांक १ जानेवारी १६८१ रोजी औरंगजेब बादशहाला कैद करून त्याची सर्व सत्ता हाती घेण्याच्या उद्देशाने त्याचा पुत्र अकबराने अजमेर येथे औरंगजेबावर हल्ला केला; परंतु या युद्धात अकबराचा पराभव झाला. तेव्हा अकबराने दुर्गादास यास सोबत घेऊन संभाजी राजे यांची मदत मिळावी म्हणून संभाजी राजे यांच्या आश्रयास आला. संभाजी राजे यांनी यावेळी अकबराकडेही लक्ष पुरविले आणि अकबर जेव्हा पाली मुक्कामी आला, तेव्हा त्याच्या भेटीसाठी नेताजी पालकर व हिरोजी फर्जंद यांना पाठवून दिले, तर यावेळी अकबरास अटक करण्यासाठी औरंगजेबाने आपला तिसरा मुलगा आजमशहा यास पाठवून दिले. आजमशहापासून अकबराचे रक्षण करण्यासाठी संभाजी राजे यांना प्रयत्न करावे लागले, तर याचवेळेस राजे संभाजी यांच्यावर अन्नातून विषप्रयोग करण्यात आला. इ.

स. १६८१ च्या सप्टेंबर महिन्यात झालेल्या या कटातील अन्नाजी दत्तो सचिव, बाळाजी आवजी प्रभू, सोमाजी दत्तो व हिरोजी फर्जंद यांना अटक करून नंतर ठार मारण्यात आले, तर दिनांक ८ सप्टेंबर १९८१ रोजी छत्रपती संभाजी राजे यांची सावत्र आई सोयराबाई हिने विष पिऊन आत्महत्या केली; कारण तिच्या संगनमतानेच राजे संभाजींवर विषप्रयोग झाला होता. दिनांक १३ नोव्हेंर १६८१ रोजी संभाजी राजे यांनी अकबराची पातशहापूर पाली येथे भेट घेतली. या भेटीत असे ठरले की, दुर्गादास याने राजपूत सैन्य आणावे. अकबराने इराणला जाऊन तेथून सैन्य आणावे व ते संभाजी राजे यांच्या सैन्यात मिसळून तिघांनी मिळून औरंगजेबाचा पाडाव करावा. सुदैवाने ही तिघांची युती यशस्वी झाली असती, तर औरंगजेबाचे पारिपत्य करणे सोपे होते; परंतु संभाजी राजे यांच्या दुर्दैवाने तसे घडून आले नाही. त्यामुळे युद्धकुशल संभाजी राजे यांचे प्रयत्न वाया गेले, तर दिनांक २२ जानेवारी १६८२ रोजी परळी किल्ल्यावर रामदास स्वामी समाधिस्थ झाले. शिवाजी महाराजांच्या स्वराज्य स्थापनेमागे जी शक्ती उभी होती, ती समाधिस्त झाली. पर्यायाने संभाजी महाराज या शक्तीपासून वंचित ठरले, तर याचवेळी पोर्तुगीज, इंग्रज, फ्रेंच, डच, निजाम, मोगल व आदिलशाही या सर्वांचेच हल्ले संभाजी राजे यांच्या स्वराज्यावर होऊ लागले. सिद्दीने कुर्ला नागोठाणे लुटले, तर मराठ्यांच्या सैन्याचा जंजिरा वेढा अयशस्वी झाला. म्हणजेच एकाचवेळी हजारो संकटांनी संभाजी राजे यांच्या जीवनात आघात करायला सुरुवात केली. या आघातांना परतविण्यासाठी संभाजी राजे यांनी राजापूर देवडीवर चढाई केली, हंडीला वेढा दिला, गोव्यातील गडाला वेढा दिला, साष्ठ बारदेशवर हल्ला चढविला, तर कवी कुलेश व अकबर यांना पोर्तुगिजांकडे पाठवून पोर्तुगिजांशी तहाच्या वाटाघाटी घडवून आणल्या. यावेळी निकोलाय मनुची याच्याकडे त्यांनी दुभाषी म्हणून जबाबदारी दिली होती. याचा अर्थ असा की, चहुबाजूने परचक्राचे हल्ले घोंघावत असताना व राजे संभाजी यांची चाणाक्ष बुद्धी अत्यंत काटेकोरपणे काम करीत होती, हे स्पष्ट होते.

ज्यावेळी औरंगजेब आदिलशाही नष्ट करण्यासाठी शेवटची स्वारी करीत होता, तेव्हा आदिलशाहीस वाचविण्यासाठी व मोगलांना समर्थपणे धडा शिकविण्यासाठी संभाजी राजे यांनी

आदिलशाहीला मदत केली होती. त्यासाठी त्यांनी कवी कुलेश यास मदतीसाठी पाठविले होते; परंतु शेवटी औरंगजेबाने आदिलशाही संपुष्टात आणली व त्याचा मनस्वी धाक घेऊन औरंगजेबाचा पुत्र अकबर इराणच्या शहाकडे रवाना झाला, तर गोवळकोंड्याची कुतुबशाही-सुद्धा औरंगजेबाने संपुष्टात आणली आणि सजीखानाच्या हल्ल्यात संभाजी राजे यांच्या सैन्याचे प्रमुख हंबीरराव मोहिते मारले गेले. या घटनेने संभाजी राजे दुःखाने व्याकुळ झाले, तर अशाही परिस्थितीत संभाजी महाराज आणि कवी कुलेश यांनी शिर्के यांनी केलेल्या बंडाचा बंदोबस्त केला व त्यांना पळवून लावले; परंतु त्यावेळी औरंगजेबाने विजापूरहून भिमातिरी आगमन केले व तुळापूर मुक्कामी छावणी टाकली असताना औरंगजेबाच्या काही सैन्याने व शेख निजामी यांनी संभाजी महाराज व कवी कुलेश यांना संगमेश्वर जवळच्याच खटोले गावी पकडले. पुढे तुळापूर मुक्कामी असलेल्या छावणीत आणून संभाजी राजे व कवी कुलेश यांचा औरंगजेबाने शिरच्छेद केला. संभाजी राजे यांचे शिर कापून ते भाल्याच्या टोकावर अडकवून दक्षिण हिंदुस्थानातील सर्व मोठ्या शहरांतून मिरविण्यात आले. यामागील औरंगजेब बादशहाचा हेतू हा होता की, दख्खनच्या सर्वच मराठी स्वराज्यात त्याची दहशत यावी; परंतु तसे झाले नाही. यामुळे मराठे सरदार पुन्हा एक होऊन औरंगजेबाशी लढू लागले व संभाजी राजांनी राज्यव्यवस्थेसाठी केलेले प्रयत्न पुन्हा कामी येऊन शाहूचे राज्य स्थापन झाले.

असा हा संभाजी राजे यांच्या जीवनाचा भयावह भीषण जीवनपट असून, त्यांनी स्वराज्याच्या राज्यकारभारासाठी केलेले प्रयत्न व पराकाष्ठा याचा शोध घेणे, या संशोधनाचे मूळ उद्दिष्ट आहे. म्हणूनच या संशोधनासाठी प्रकरणरचना अशी केलेली आहे.

प्रकरण पहिले : संभाजी महाराज **यांचा जन्म, बालपण, शिक्षण आणि राज्यकारभार प्रवेश**
प्रकरण दुसरे : संभाजी महाराज **यांचे अनुभव आणि स्वराज्य निर्मितीतील योगदान**
प्रकरण तिसरे : संभाजी महाराज **यांचा राज्यकारभार आणि मुत्सद्यांची कटकारस्थाने**
प्रकरण चौथे : संभाजी महाराज **यांचे स्वराज्यरक्षण आणि एकाकी झुंज**
प्रकरण पाचवे : **निष्कर्ष, समारोप व शिफारशी**
: **संदर्भग्रंथसूची**

अशी प्रकरणांची रचना करून संभाजी राजे यांच्या राज्यकारभारातील स्वराज्यरक्षण, मुलकी व्यवस्था, धूर्त राजकारणी डाव, तह आणि करार तसेच राज्यकारभारातील डावपेच यांचे दर्शन या संशोधनातून घडविणे या संशोधनाचे एक उद्दिष्ट आहे. तसेच संभाजी महाराज हे शिवाजी महाराजांपेक्षा तसूभरही राज्यकारभारात कमी पडणार नाही, असे स्वराज्यातील त्यांचे नेतृत्व होते; परंतु शिवाजी महाराजांच्या वेळची परिस्थिती आणि संभाजी महाराजांच्या वेळची परिस्थिती यात महत् अंतर निर्माण झाले. शिवाजी महाराजांना आदिलशाही, मोगल आणि इंग्रज एवढेच शत्रू होते, तर त्यांना निपटून काढण्यासाठी संपूर्ण मंत्रिमंडळ आणि शिवाजी महाराजांवर जीवन ओवाळून टाकणारे सरदार, सेनापती त्यावेळी होते, तर हेच मंत्रिमंडळ आणि सरदार, सेनापती संभाजी राजे यांच्या विरोधात जाऊन इंग्रज, डच, फ्रेंच, पोर्तुगीज याशिवाय आदिलशाही, मोगल आणि घरच्या नातलगांची असणारी माणसे संभाजी राजे यांच्या विरोधात गेली होती, त्यात शिर्के सारखी मंडळी होती. शेवटी यांनीच संभाजी राजे यांना संगमेश्वरी पकडून देण्यात औरंगजेबाला मदत केली होती. त्यामुळे संभाजी राजे यांचा निर्घृण वध औरंगजेबाला करता आला होता. तरीही एवढी संकटे डोक्यावर घरघरत असताना संभाजी राजे यांनी स्वराज्यातील आपल्या प्रदेशाच्या रक्षणासाठी रात्रंदिवस तलवार हाती घेतली होती. तसेच औरंगजेब ज्या उच्चतर पातळीवर ईश्वराची प्रार्थना करून यश मिळवित होता, तशीच शाक्त पंथाची उपासना करून औरंगजेबास नामोहरम करता येईल का, यासाठी संभाजी राजे शेवटी संगमेश्वरी शाक्तपंथी उपासनेत गर्क झाले होते व त्यामुळे बेसावध होऊन औरंगजेबाच्या हशमांच्या हाती सापडले होते, हे स्पष्ट करणेही या शोध प्रबंधाचे एक उद्दिष्ट आहे. एकंदरित, भयवाह भीषण संकटांची वादळे सर्वत्र उठलेली असताना संभाजी राजांनी स्वराज्याचा प्रदेश कसा जतन केला आणि शिवाजी महाराजांच्या कष्टाने मिळविलेले राज्य कसे राखले हे स्पष्ट करणे, या शोध प्रबंधाचा एक हेतू आहे. त्यासाठी शिवाजी महाराजांनी मिळविलेले स्वराज्य व त्यासाठी उभारलेली तटबंदीची (किल्ले) ठिकाणे, संभाजी राजे यांनी राखलेले प्रदेश व गमावलेले प्रदेश, तसेच राजाराम महाराज यांच्या काळात मराठ्यांकडे उरलले फक्त चारच किल्ले या सर्वांचे सविस्तर नकाशे संशोधनातून सादर करणेही या संशोधनाचे एक अंग आहे.

एकंदरित, संभाजी राजे यांच्या राज्यकारभाराचे सर्व दुवे या संशोधनातून स्पष्ट करण्यासाठी हे संशोधन कार्य हाती घेतले असून, संभाजीचा वध केला म्हणजे मराठेशाही संपूर्णपणे बुडेल, असा औरंगजेबाचा तर्क होता, तो शेवटी खोटा ठरला व वीस-पंचवीस वर्षे दख्खनच्या भूमीवर सतत युद्ध करूनही औरंगजेबाच्या हाती काहीच लागले नाही. एवढेच नाही, तर पुन्हा नव्या रूपातून मराठेशाही पुन्हा उभी राहिली, याचे सर्व श्रेय संभाजी राजे यांच्या राज्यकारभार करण्यातील दूरदृष्टीला आहे, हे सिद्ध करणे या संशोधनाचे एक महत्त्वाचे उद्दिष्ट आहे.

यासाठी मान्य संशोधन प्रणालीचा अवलंब करून मी 'संभाजी राजे यांचा राज्यकारभार : एक अभ्यास' या विषयाचे संशोधन कार्य हाती घेतले आहे. आजवर न झालेले व नव्याने होत असलेले माझे संशोधन जिज्ञासूंना नवी दृष्टी देईल, याची मला खात्री आहे.

संशोधन मार्गदर्शक

डॉ. आर. एस. फुन्ने
एम.ए., पीएच.डी.
प्राचार्य,
स्व. नितीन कला व विज्ञान महाविद्यालय,
पाथरी, जि. परभणी

संशोधक विद्यार्थी

अनिरुद्ध सर्जेराव उढाण
एम.ए., बी.एड.
इतिहास विभाग,
अंकुशराव टोपे कला, वाणिज्य व
विज्ञान महाविद्यालय, जालना

दिनांक :   /   /

संदर्भग्रंथसूची

अ. क्र.	ग्रंथाचे नांव	लेखकाचे नांव	प्रकाशन वर्ष
१)	आलमगीरनामा	मिर्झा अहमद कासीम	१९४१
२)	अनुपुराण (संस्कृत)	कविंद्र परमानंद	१९५०
३)	अभिलाषीचितार्थ (संस्कृत)	सोमेश्वर देव विरचित	१९३५
४)	आकाशभैरव (संस्कृत)	अप्रकाशित स्फुट तजोदेकर महाराज	१८५९
५)	इतिहास आणि ऐतिहासिक	द.ब. पारसनीस	१९१६
६)	ऐतिहासिक संकीर्ण साहित्य	वि.वा. वाकेसनीस	१९१९
७)	औरंगजेब आलमगीर इतिहास	देविप्रसाद मुन्सीफ	१९१०
८)	कायस्थधर्मप्रदीप	म.का. कारखानीस	१९१९
९)	काव्यइतिहास संग्रह	काशीनाथ साने	१८८८
१०)	दक्षिणेतील सरदारांच्या कैफियती	पुरुषोत्तम विश्वास	१९०८
११)	कौटिलीय अर्थशास्त्र	हिवरगांवकर	१९२७
१२)	गोवळकोंड्याची कुतुबशाही	वा.सी. बेंद्रे	१९३४
१३)	नोकरशाहीचे बंड	केशव ठाकरे	१९१९
१४)	चिटणीस घराण्याची माहिती	बालकृष्ण कुलकर्णी	१९३५
१५)	शिवाजी महाराजांची बखर	काशीनाथ साने	१८९५
१६)	श्रीमंत थोरले राजाराम महाराज चरित्र	काशीनाथ साने	१८९५
१७)	श्रीमंत छत्रपती संभाजी महाराज चरित्र	काशीनाथ साने	१९१५
१८)	ईश्वर विलास काव्य	श्रीकृष्णभट्ट विरचित	१९५८

अ. क्र.	ग्रंथाचे नांव	लेखकाचे नांव	प्रकाशन वर्ष
१९)	शिवछत्रपतींची बखर	विमल वाकेसनीस	१९३०
२०)	ऐतरेय ब्राह्मण	भाऊशास्त्री लेले	१९१७
२१)	कछवाहों का इतिहास	ठाकूर वीरसिंह	१९३१
२२)	चैतन्यलीला	कृष्णदास बैरागी	१९५०
२३)	जेधे शकावली	स.ग. जोशी	१९२५
२४)	ताराबाईकालीन कागदपत्रे	डॉ. आबासाहेब पवार	१९६९
२५)	दंडनीति प्रकरणम्	केशव पंडित	१९४३
२६)	पेशवे दप्तर ग्रंथमाला	विरेंद्र पागारकर	१९५०
२७)	प्रभात मासिक	गोविंद काशीनाथ चांदोरकर	१९१७
२८)	बुधभूषणम	संपादन एच.डी. वेलणकर	१९२६
२९)	वंशचरित्र	वि.का. राजवाडे	१९३६
३०)	घोरपडे घराण्याचा इतिहास	द.वि. आपटे	१९३४
३१)	राज्याभिषेक पद्धती	मावजी वायस	१९१५
३२)	राज्यव्यवहार कोश	रघुनाथ पंडित	१९२५
३३)	क्षत्रिय जाती का इतिहास	ठाकूर रुद्रसिंह	१९८३
३४)	विजापूर आदिलशाहीचा इतिहास	बाळाजी मोडक	१८८६
३५)	विविध ज्ञानविस्तार	दिनकर वझे	१९२४
३६)	वैद्य दासर	शंकर वैद्य	१९४४

अ. क्र.	ग्रंथाचे नांव	लेखकाचे नांव	प्रकाशन वर्ष
३७)	जेधे शकावली	प्रल्हाद घोडेगांवकर	१९२५
३८)	शिवाजी महाराजांची बखर	पांडुरंग नंदुरबारकर	१८९५
३९)	शंभू विलासिका	कवी हरी	१८७५
	<u>इंग्रजी संदर्भग्रंथ</u>		
1.	The Life of Shivaji	Jadunath Sarkar	1917
2.	Dutch Record	Daga Bell	1920
3.	English Record on Shivaji	Venkat Raman	1931
4.	Foreign Biography of Shivaji	Surendra Nath	1940
5.	Factory Records of East India	V.S. Bendre	1646
6.	History of Inquisition	William Harris	1868
7.	Particular Account of the Several District	Mudra Rode	1950
8.	Shahajada Akbar	V.S. Karve	1960
9.	Rani Yesubai	Varuna Kamat	1965
10.	Sambhaji Raje	A.R. More	1967

अशा काही संदर्भग्रंथांचा आधार घेऊन केलेले हे संशोधन जिज्ञासूंना हे संदर्भग्रंथ तसेच त्यातील संदर्भ पाहण्याचा निश्चित मोह होईल, हे गृहित धरून ग्रंथाचे शीर्षक, ग्रंथकर्त्याचे नांव, प्रकाशकाचे नांव, प्रकाशन स्थळ, प्रकाशन वर्ष, आवृत्ती आणि पृष्ठ क्रमांक नोंदवून ते प्रकरणाच्या शेवटी जोडले आहेत.

❑ ❑ ❑